# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७५६ दिनांक २८.१०.२०२०

## मनोर पोलीस ठाणे यांचेकडुन ज्वालाग्राही पदार्थ सोबत बाळगुन वाहतुक करणा-या आरोपीतांवर कारवाई

मा.पोलीस अधीक्षक, पालघर श्री. दत्तात्रय शिंदे यांनी महामार्गावर होणा-या जबरी चोरी, दरोडा, ऑइल चोरी, अवैद्य माल वाहतुक यासारख्या गुन्हयांना आळा घालण्याकरिता नियमित महामार्गावर पोलीस गस्त घालण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे मनोर ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असतांना दिनांक २६/१०/२०२० रोजी २१.५० वाजताचे सुमारास मौजे चिल्हार गावचे हद्दीत ता.जि.पालघर येथे यातील आरोपी विकास गोविंद पाटील वय ४३ वर्षे व इतर १ इसम यांनी त्यांचे ताब्यातील महींद्र पिकअप जीप क्र.एमएच ०४एचएस-०५१३ हीचेमध्ये अवैधरित्या डिझेल ज्वलनशील पदार्थाचा साठा विक्री करण्याकरता विनापरवाना आपले कब्जात बाळगुन व साठवणुक करुन मानवी जीवन धोकयात येईल व ज्वलनशील पदार्थामुळे मानव जिवीतास पोहोचणाऱ्या संभाव्य धोक्यापासुन खबरदारी न घेता हयगयीचे वर्तन करीत असताना मिळुन आले. सदर गुन्हयातील आरोपीत यांचे ताब्यातुन एकुण ६,४८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन मनोर पोलीस ठाणे गु.र.नं.१८४/२०२० भा.द.वि.सं कलम- २८५,३४ सह जिवनावश्य वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ७ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई सपोनि/श्री.प्रताप दराडे, प्रभारी अधिकारी मनोर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली मनोर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner